**विंधणविहीर कार्यक्रम, वायुसंपीडक सुरुंग कार्यक्रम तसेच जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसाठी कायमस्वरुपी विभागीय भांडार खरेदी समितीचे पुनर्गठण करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :ग्रापापु-१००१/ प्र.क्र. २८५ / पापु- ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १२ जून २००१**

**वाचा :-** १) शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-१०८८ / (२५१२)/ उद्योग-६, दिनांक २/१/१९९२

२) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. आपना-३७९५/प्र.क्र.८४७/ जल-५, दिनांक १४/९/१९९५

३) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु-१००१ / प्र.क्र.२५०/पापु-०७, दिनांक ३१/३/२००१

**प्रस्तावनाः-**

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसाठी ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या संदर्भीय क्र.२ येथील, दिनांक १४/९/१९९५ च्या शासन निर्णयानुसार विभागीय भांडार खरेदी समितीचे गठण करण्यात आले आहे. राज्य शासनाकडील **विंधणविहीर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रम** या योजना जिल्हा परिषदांकडे राबविण्यासाठी हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. या संदर्भात क्र.३ येथील शासन निर्णयातील परिच्छेद-४ **नुसार विंधणविहीर कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी शासन स्तरावरील विभागीय भांडार खरेदी समितीने निश्चित केलेल्या दरानुसार व पुरवठादारांकडून करावयाची आहे.**

२. जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित विंधणविहीर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रमासाठी तसेच **जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याच्या खरेदीसाठी** संदर्भीय क्र.२ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या विभागीय भांडार खरेदी समितीचे पुनर्गठण करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.



४०७

**शासन निर्णय -**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन विंधणविहीर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रमासाठी तसेच जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याच्या खरेदीसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत विभागीय भांडार खरेदी समितीचे पुढीलप्रमाणे पुनर्गठण करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| १. सहसचिव/उपसचिव | (जिल्हा परिषदा आस्थापना सांभाळणारे- पापु-०७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| २. संचालक | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे. | सदस्य |
| ३. मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हा परिषद, नाशिक | सदस्य |
| ४. सहसंचालक | उद्योग संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ५. मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी | जिल्हा परिषद, ठाणे | सदस्य |
| ६.वरिष्ठ खोदन अभियंता (मुख्यालय) | भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| ७. कार्यकारी अभियंता | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद , औरंगाबाद. | सदस्य |
| ८. अवर सचिव (पापु- १५) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ९.कक्ष अधिकारी (पापु- ०७) | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य-सचिव |

**समितीची कार्यकक्षा**

उक्त समिती विंधणविहीर कार्यक्रम व वायुसंपिडक सुरुंग कार्यक्रमासाठी तसेच जिल्हा परिषदांमार्फत व भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणामार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमांसाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रकारच्या साहित्याच्या खरेदी संबंधात **साहित्याचे दर व पुरवठादारांची यादी शासनाच्या संमतीने निश्चित करील.**

२. सदर समिती ही स्थायी स्वरुपाची असून सदर समितीची बैठक दरवर्षी जून महिन्यात व आवश्यकतेनुसार घेण्यात येईल. **सदर समितीने ठरविलेले दर व पुरवठादारांची यादी त्या वर्षाच्या सप्टेंबर ते पुढील वर्षाचा ऑगस्ट महिना या कालावधीसाठी अंमलात असतील.**

३. सदर समितीतील शासकीय अधिकारी यांचा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता याचा खर्च संबंधितांनी त्यांच्या विभागाच्या आस्थापनेच्या अनुदानातुन भागवावा.



४०८

४.	सदर शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २ जानेवारी १९९२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

**(सुधाकर ज्ञा. बोबडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मंत्री (पापुवस्ववि) यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (पापुवस्ववि) यांचे खाजगी सचिव
३. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. सदस्य सचिव (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
५. सदस्य सचिव (तांत्रिक ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
६. उपसचिव, (श्री. ठाकरे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मंबई.
७. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पुणे.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
९. सहसंचालक, उद्योग संचालनालय, मुंबई.
१०. मुख्य लेखा व वित्तअधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
११. वरिष्ठ खोदन अधिकारी, (मुख्यालय) , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे-३७
१२. कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग , जि.प.औरंगाबाद.
१३. प्रादेशिक मुख्य अभियंता, मजीप्रा. (सर्व)
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (नाशिक वगळून सर्व)
१५. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व)
१६. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद, ( ठाणे वगळून सर्व )
१७. कार्यकारी अभियंता , ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद , (औरंगाबाद वगळून सर्व)
१८. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , (सर्व)
१९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , (सर्व)
२०. उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय , मुंबई
२१. अवर सचिव, कार्यासन पापु-१५, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
२२. विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
२३. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७, पापुवस्ववि., मंत्रालय, मुंबई



४०९